CNR NO.MHSO060004602011

**विशेष दिवाणी दावा क्र.१२९/२०११**

कमलाकर साळुंखे

*वि.*

बाबुराव जवळेकर, वगैरे

**निशाणी क्र.२०८ वरील आदेश**

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.४ यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २३ नियम १ व २ तसेच कलम १५१ प्रमाणे दावा फेटाळण्याकरिता दाखल केलेला आहे. अर्जातील प्रतिवादी क्र.४ चे कथन जशाच्या तसे खालीलप्रमाणे –

२. ''(१) प्रस्तुत दावेकामी प्रतिवादी नं.४ यांनी मा. उच्च न्यायालय मुंबई येथे सी.पी.सी. ऑर्डर ७ रुल ११ अन्वयेचा सिव्हील रिव्हीजन अर्ज ६/२०२३ दाखल केला होता. सदर अर्ज मा. उच्च न्यायालय यांनी नामंजुर करताना त्यांचे आदेशामधील पॅरा नं.१५ मध्ये One more liberty that is to challenge the Maintainability of the present suit बाबत प्रतिवादी यांना मुभा (liberty) दिली आहे की, “However, defendants shall be at liberty to file an appropriate application, if so available to them in law and if any such application is filed, the court shall decide the same in accordance with law” असे नमूद केल्यामुळे प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

(२) दाव्यामधील वादी यांनी त्यांचा प्रथम दावा रे.मु.नं.४७२/२००२ हा दावा मे. दिवाणी न्यायाधीश ज्युनियर डिव्हीजन, पंढरपूर यांचे न्यायालयात दि.१६/१२/२००१ च्या तथाकथित अनोंदणीकृत साठेखत दस्ताअन्वये Simplicitor suit for injunction बाबत प्रतिवादी नं.१ श्री. बाबुराव जवळेकर वगैरे ३ यांचेवर दाखल केला होता. तसेच वादीच्या दाव्याची नोटीस दिनांक २१/१०/२००२ व दिनांक ०२/११/२००२ अन्वये Specific Performance पुर्ण करण्यास नकार दिलेला होता आणि बोगस खोटे तथाकथित शंभर रुपये स्टॅम्प अन्वये अनोंदणीकृत साठेखताचे दस्ताबाबत फौजदारी तक्रार मुळ वादी मयत कमलाकर एकनाथ साळुंखे यांचेवर

दाखल केलेली होती. नंतर तथाकथित अनोंदणीकृत साठेखत दस्तान्वये मुदतबाह्य (Time barred) Specific performance बेकायदेशीररित्या मुदतीमध्ये आणण्याचे दृष्टीने Clever drafting अन्वये दि.२२/०४/२०१० रोजी रे.मु.नं.४७२/२००२ हा दावा काढून घेणे (withdraw the suit) आणि निरंतर ताकीदीचा दावा अन्वये दाव्यात यश मिळणे कायद्याने अडचणीचे आहे व वादीने दाव्यात साठेखतावरुन खरेदीची मागणी केली नाही म्हणून व सदर डिफेक्ट हा formal defect आहे अशी तक्रार करुन मुळ दावा काढून घेऊन त्याच वाद मुळावर fresh suit for specific performance and injunction बाबतचा दावा दाखल करणेस परवानगी घेऊन प्रस्तुतचा दावा दाखल केला आहे. सदर नमुद डिफेक्ट हा formal defect नाही म्हणुन प्रस्तुतचा दावा फेटाळण्यात यावा.

तसेच वादीने मुळ दावा रे.मु.नं.४७२/२००२ हा दि.२२/०४/२०१० रोजी काढून घेणेसाठी अर्ज दिल्यानंतर मा. न्यायालयांनी दावा काढून घेण्यास दि.१५/०९/२०१० रोजी परवानगी दिल्यानंतर त्वरीत दाखल करणे कायद्याने आवश्यक होते परंतू सुमारे एक वर्षानंतर (११ महिने २३ दिवसानंतर) म्हणजे दिनांक ०७/०९/२०११ रोजी fresh suit दाखल केला. त्यास मुदत कायद्याची बाधा येते आणि याबाबत उशीर माफी (delay condone) चा अर्ज नसल्यामुळे प्रस्तुतचा दावा चालू शकत नाही. सदर दावा फेटाळणे (dismiss) आवश्यक आहे.

(३) प्रस्तुतचा स्पे. मु. नं.१२९/२०११ हा दावा काढून घेताना नमुद केलेले कारण हे formal defect आहे हे संपूर्णपणे बेकायदेशीर/चुकीचे आणि सी.पी.सी.ऑर्डर २३ रुल १ अन्वये डिफेक्ट हा formal defect नसुन major defect आणि time barred claim for specific performance आहे व त्यास सी.पी.सी. ऑर्डर २३ रुल २ ची बाधा येते. या कायदेशीर बाबीचा तत्कालीन न्यायाधीश साहेब यांनी विचार केला नाही आणि तसे Specific Performance बाबत मुदत वाढवुन देणेचे मा. न्यायालयास अधिकार नाहीत.

(४) सदर आदेश सी.पी.सी. ऑर्डर २३ रुल १ अन्वये आणि सी.पी.सी. ऑर्डर २३ रुल २ अन्वये मेंटेनेबल नाही त्यास नवीन दाव्यास मुदत

कायद्याची बाधा येते म्हणून प्रस्तुतचा दावा फेटाळणे कायद्याने आवश्यक आहे. वादीचे मुळ दाव्यात प्रतिवादी नं.१ ते ३ होते परंतू fresh suit स्पे.मु.नं.१२९/२०११ मध्ये प्रतिवादी नं.४ ते ६ यांना समाविष्ट केले असून याबाबत कोणत्याही न्यायालयाची परवानगी घेतलेली नाही म्हणूनही प्रस्तुतचा दावा मेंटेनेबल नाही.

(५) वादीचा मुळ दावा रे.मु.नं.४७२/२००२ हा मे. सिव्हील जज्ज ज्युनिअर डिव्हीजन पंढरपूर यांचेकडे दाखल होता परंतू मुळ दावा काढून घेऊन प्रस्तुतचा नवीन दावा मे. सिव्हील जज्ज सिनिअर डिव्हीजन पंढरपूर यांचेकडे दाखल केला आहे या ही कायदेशीर बाबीचा विचार करण्यात यावा तशी आवश्यक असणारी मा. न्यायालयाची परवानगी घेतलेली नाही. तथाकथीत अनोंदणीकृत १००/- रुपयेच्या स्टॅम्पवरील साठेखत दस्तान्वये Specific Performance ची मागणी मेंटेनेबल नाही. बॉम्बे स्टॅम्प ॲक्ट सेक्शन ३३ अन्वये तथाकथीत कब्जा साठेखत १००/- रुपयेच्या स्टॅम्पवरील वैध नाही. रजिस्ट्रेशन कायद्यान्वये कब्जा साठेखत नोंदणीकृत असणे बंधनकारक आहे. याही कायदेशीर बाबीची दाव्यास बाधा येत असून प्रस्तुतचा दावा चालु शकत नाही तो नामंजूर करणे आवश्यक आहे.

(६) प्रस्तुतचे दाव्यामधील प्रतिवादी नं.१ श्री. बाबुराव जवळेकर यांनी तथाकथीत बोगस अनोंदणीकृत साठेखत दस्ताबाबत मुळ वादी (मयत) कमलाकर साळुंखे यांचे विरुध्द आर.सी.सी.नं.१७९/२००३ अन्वये फौजदारी केस दाखल केली असून त्याअन्वये तथाकथीत अनोंदणीकृत साठेखत दस्त पोलीसांनी जप्त केलेला आहे. याबाबत प्रस्तुतचे दाव्यामध्ये कोठेही उल्लेख नाही. सदर गंभीर महत्वाची बाब मा. न्यायालयापासून लपवून ठेवून (Suppression of Material Fact) प्रस्तुतचा दाखल केलेला दावा सी.पी.सी. सेक्शन १५१ अन्वयेचा अधिकाराचा वापर करुन फेटाळण्याची विनंती आहे.

वर नमुद सर्व कायदेशीर मुद्यांचा विचार करुन सी.पी.सी. ऑर्डर २३ रुल १ आणि सी.पी.सी. ऑर्डर २३ रुल २ व सी.पी.सी. सेक्शन १५१ च्या Inherent power अन्वये वादीचा दावा फेटाळणे (dismiss) आवश्यक आहे".

३.	वादीने प्रस्तुत अर्जास म्हणणे मांडले की, अर्ज बेकायदेशीर आहे. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २३ नियम १ व २ च्या तरतुदी येथे लागु होत नाहीत. मा. उच्च न्यायालयाने दावा विहित कालावधीत निकाली काढण्याचे आदेश केलेले आहेत. प्रतिवादीचे इतर अर्ज नामंजूर झालेले आहेत. पुन्हा अर्ज देवुन प्रतिवादी प्रकरण लांबवित आहे. करिता, अर्ज विशेष खर्च रु.५,०००/- सह नामंजूर करण्यात यावा. सदरील म्हणणे हाच युक्तिवाद समजण्यात यावा अशी विनंती वादी करतात.

४.	निशाणी क्र.२१० वरीलप्रमाणे निशाणी क्र.२०८ या अर्जास प्रतिवादी क्र.४ यांचा युक्तिवाद जशाचा तसा खालीलप्रमाणे -

"प्रस्तुतचे दावे कामी प्रतिवादी क्र.४ यांनी मा. उच्च न्यायालय मुंबई यांचे आदेशा अन्वये सिव्हील रिव्हीजन अर्ज क्र.६/२०२३ प्रमाणे प्रतिवादी यांना दिलेल्या मुभा (Liberty) अन्वये Maintainability of the present suit बाबत दाखल केलेल्या नि.२०८ च्या अर्जास लेखी युक्तीवाद खालीलप्रमाणे -

(१)	दाव्यामधील मयत कमलाकर साळुंखे वादी यांनी त्यांचा प्रथम दावा रे.मु.नं.४७२/२००२ हा दावा मे. दिवाणी न्यायाधिश ज्युनिअर डिव्हीजन पंढरपूर यांचे न्यायालयात दिनांक १६/१२/२००१ च्या अनोंदणीकृत साठेखत दस्ता अन्वये Simplicitor suit for injunction बाबत प्रतिवादी नं.१ बाबुराव जवळेकर वगैरे ३ यांचेवर दाखल केला होता. सदर दावेकामी दावा दाखल केलेपासून सन २०१० पर्यंत Specific Performance ची मागणी केलेली नव्हती नंतर दि.१५/०९/२०१० रोजी सदर दावा काढून घेऊन Fresh suit for same case of action दाखल करणेची परवानगी अन्वये दावा काढून घेऊन सुमारे आठ वर्षानंतर Specific Performance मागणेची विनंती आणि सदर defect formal defect आहे असे नमुद करुन दावा काढून घेतल्यानंतर प्रस्तुतचा दावा Specific Performance बाबत दाखल केलेला आहे.

(२)	वादी यांचे दावा कॉलम ४ मध्ये असे कथन आहे की, दावा मिळकत खरेदीबाबत नोटीस दि.२१/१०/२००२ व ०२/११/२००२ अन्वये Specific Performance ची मागणी केली होती त्यास प्रतिवादी नं.१

बाबुराव जवळेकर यांनी नकार दिलेला होता. त्यानंतर खोटे, बोगस तथाकथीत साठेखत दस्त अस्तीत्वात आणलेबाबत नमुद करुन याबाबत पोलीस स्टेशन मध्ये फौजदारी तक्रार आर.सी.सी.नं.१७९/२००३ दाखल केलेली होती. त्याकामी मयत वादी कमलाकर साळुंखे यांना अटक होऊन तथाकथीत दिनांक १६/०१/२००१ चा साठेखत दस्त पोलीसांनी जप्त केलेला आहे. यासर्व बाबी मा. न्यायालयापासून लपवून ठेवून प्रस्तुतचा दावा स्पे.मु.नं.१२९/२०११ वादी यांनी दाखल केला होता. दावा Suppression of Material Fact अन्वये व सी.पी.सी. सेक्शन १५१ अन्वये फेटाळणे (dismiss) कायद्याने आवश्यक आहे.

(३) वादी यांचा मुळ दावा रे.मु.नं.४७२/२००२ काढून घेतेवेळी Specific Performance मागणी करणे आणि सदर दोष हा Formal defect आहे असे नमुद करुन मुदतबाह्य (time barred) Specific Performance ची मागणी केली आणि तत्कालीन न्यायालयाने मुदत कायदा १९६३ चे कलम ३ आणि मुदत कायदा आर्टीकल ५४ बाबत विचार न करिता Specific Performance बाबत फ्रेश नवीन दाव्यात मागणी करणेस परवानगी दिली हे मा. न्यायालयाचे आदेश अधिकार क्षेत्राचे बाहेरील आहेत म्हणून सदर मुदत बाह्य Time barred claim सी.पी.सी. ऑर्डर २३ रुल १ अन्वये formal defect नसुन material defect आहे. ऑर्डर २३ रुल १ आणि सी.पी.सी. ऑर्डर २३ रुल २ आणि मुदत कायदा सेक्शन अन्वये प्रस्तुतचा दावा कायद्याने चालु शकणार नाही तो फेटाळणे (dismiss) आवश्यक आहे.

(४) वादीचे कथनानुसार दि.२१/१०/२००२ आणि दि.०२/११/२००२ रोजी मुळ दावा रे.मु.नं.४७२/२००२ कामी Specific Performance सुमारे ३ वर्षाचे नंतर वाढवून देणेकामी मुदत कायदा आर्टीकल ५४ अन्वये मा.न्यायालयास नाहीत म्हणून त्याच वाद कारणावरुन नवीन Fresh suit for Specific Performance बाबत चा दिनांक १५/०९/२०१० आदेश सी.पी.सी. कायद्यान्वये कायदेशीर नसुन प्रस्तुतचा fresh suit हा फेटाळणे योग्य होईल.

(५) सी.पी.सी. ऑर्डर २३ रुल १ अन्वये जर वादीने Formal

defect आणि sufficient cause बाबतचा खुलासा मा. न्यायालयात नमुद केल्यास मा. न्यायालयास दावा काढून घेणेची परवानगी देता येते परंतु मुळ दाव्यातील नमुद defect हा formal defect नाही सदर defect हा major defect असुन मुदत बाह्य (Time barred claim) दावा व Specific Performance मागणीचा Fresh Suit मुदत कायदा १९६३ चे कलम ३ अन्वये फेटाळणे आवश्यक आहे आणि मुदत बाह्य Specific Performance claim बाबत नवीन दाव्यास सी.पी.सी. ऑर्डर २३ रुल २ अन्वये बाधा येते कारण सदर प्रोव्हीजन अन्वये In any fresh suit instituted on permission granted under the last proceeding rule the plaintiff shall be bound by the law of limitation in the same manner as if the first suit had not been instituted म्हणून प्रस्तुतचा दावा फेटाळणे आवश्यक आहे.

(६) वादी यांनी नि.नं.२०८ बाबत दाखल केलेले म्हणणे अत्यंत बेकायदेशीर चुकीचे आहे. कायदेशीर वस्तुस्थिती बाबत कुठलाही खुलासा नाही. वादी यांनी त्यांचे म्हणणे मधील मुद्दा क्र.४ मध्ये नमुद केलेले नि.नं.३१, ३२, ३३ आणि नि.नं.१११, ११४ नि.नं.१३१, १४५ आणि नि.नं.१४९, १६८ हे अर्ज वेगवेगळे सिव्हील प्रोसिजर कलमान्वये दाखल केले असुन त्या अर्जाचा प्रस्तुतचे नि.नं.२०८ अर्जातील मागणीचा विषय वेगळी असून मा. उच्च न्यायालयांनी दिलेल्या परवानगी आदेशान्वये नि.नं.२०८ चा अर्ज दाखल केलेला आहे.

(७) वादी यांनी मुळ दावा रे.मु.नं.४७२/२००२ हा दि.१५/०९/२०१० रोजी काढून घेतल्यानंतर फ्रेश सुट हा दि.०७.०९.२०११ रोजी म्हणजे सुमारे १ वर्षाने दाखल केलेला असून याबाबत झालेल्या उशीर माफी बाबत वादी कसलाही खुलासा करीत नाही. त्यांचा नवीन दावा मेंटेनेबल नाही आणि मुळ दावा जर चुकीच्या कोर्टात दाखल असेल तरच त्या दाव्यामधील व्यतीत कालावधी मुदत कायदा आर्टीकल १४ अन्वये वगळणेची तरतूद असून वादीने स्वतःच्या जबाबदारीवर मुळ दावा काढून घेतलेला असल्यामुळे वादीस मुदत कायदा आर्टीकल १४ अन्वयेचा फायदा मिळणार नाही. म्हणून प्रस्तुतचा दावा चालू शकणार नाही.

(८) रे.मु.नं.४७२/२०२२ मध्ये १ ते ३ प्रतिवादी होते. प्रस्तुतचे दाव्यामध्ये ४ ते ६ नवीन प्रतिवादी समाविष्ट केले असुन याबाबत कोणत्याही न्यायालयाची परवानगी घेतलेली नाही आणि त्यामुळे सदर प्रतिवादी मुळ दाव्यात पार्टी नव्हते म्हणुन Non-joinder of necessary party ची बाधा येते, म्हणुन प्रस्तुतचा दावा फेटाळण्यात यावा मुळ तथाकथीत अनोंदणीकृत साठेखत दस्तामध्ये प्रतिवादी क्र.४ ते ६ हे पार्टी नव्हते. त्यामुळे त्यांचे विरुध्द Specific Performance ची मागणी कायद्याने मेंटेनेबल नाही आणि प्रतिवादी नं. ४ ते ६ हे bonafide purchaser आहेत त्यांचे झालेल्या खरेदीखताचे व्यवहार हे कायदेशीर रजिस्टर दस्तान्वये अस्तीत्वात येऊन दावा मिळकतीचे बिनशेती १ ते ८८ प्लॉट मध्ये रुपांतरण झालेले आहे. त्यामुळे मुळ दावा मिळकत शेतजमीन नसुन बिगरशेती प्लॉट जमिनीमध्ये रुपांतरण झाल्यामुळे प्रस्तुतचा दावा चालू शकणार नाही. वादी हे मा. न्यायालयाचे आदेश मानत नाहीत. दिनांक १८/१०/२०१८ रोजीचे मा. न्यायालयाचे आदेशान्वये तथाकथीत अनोंदणीकृत साठेखत दस्त Impound करणेकामी दाखल करणे आवश्यक असताना अद्यापपर्यंत मागील सहा वर्षापासून दाखल नाही. आणि नि.नं.१४२, नि.नं.१४५ च्या अर्जान्वये प्रतिवादींनी मा. न्यायालयाचे आदेशाचे पालन करणेबाबत विनंती अर्ज केला असताना त्या कामी वादी हे खोटी माहिती मा. न्यायालयात देतात सदर तथाकथीत अनोंदणीकृत दस्त महसुली न्यायालयात दाखल आहे अशी खोटी माहिती देऊन मा. न्यायालयाचे दिनांक १८/१०/२०१८ च्या आदेशाचा अवमान केलेला आहे. सी.पी.सी. सेक्शन १५१ अन्वये खोटी माहिती मा. न्यायालयात दिली म्हणून कार्यवाही करण्याची प्रतिवादीची विनंती आहे.

(९) तसेच वादी यांचे तथाकथीत अनोंदणीकृत साठेखत दस्त १००/- रुपयांचे स्टॅम्पवर असून नोंदणी कायद्यान्वये सदर साठेखत नोंदणीकृत असणे बंधनकारक आहे. Bombay Stamp Act Section 33 & Section 35 ची बाधा येते म्हणून प्रस्तुतचा दावा चालू शकत नाही.

वरील लेखी युक्तीवादाचा विचार करुन वादी यांचा दावा चालू शकणार नाही म्हणून फेटाळण्याची प्रतिवादी यांची विनंती आहे''.

५. प्रतिवादी क्र.४ ने दाखल केलेला अर्ज, त्याअनुषंगाने वादीचे म्हणणे, प्रतिवादी क्र.४ चा लेखी युक्तिवाद (निशाणी क्र.२१०) व प्रतिवादी क्र.४ ने दाखल केलेले मा. सर्वोच्च न्यायालय व मा. उच्च न्यायालयाचे न्यायनिर्णय (निशाणी क्र.२११, २१२ व २२० प्रमाणे) विचारात घेण्यात आले. प्रतिवादी क्र.४ ने त्याचे अर्जाचे पुष्टयर्थ दाखल केलेला लेखी युक्तिवाद हा निशाणी क्र.२१० हा आहे. त्या युक्तिवादातील परिच्छेदांचा तपशिलवार खुलासा उपरोक्त केलेला आहे, त्यातील प्रत्येक परिच्छेदातील युक्तिवादाच्या अनुषंगाने तपशिलवार कारणे खालीलप्रमाणे नमूद करणे योग्य होतील व त्याअनुषंगाने मा. सर्वोच्च न्यायालय व मा. उच्च न्यायालयाचे मार्गदर्शक निवाडे विचारात घेणे योग्य होतील.

६. प्रतिवादी क्र.४ चा लेखी युक्तिवाद (निशाणी क्र.२१०) यातील परिच्छेद क्र.१ हा विचारात घेण्यात आला. त्यातील युक्तिवाद हा नियमित दिवाणी दावा क्र.४७२/२००२ हा कोणत्या न्यायालयात व कोणत्या दादीसंदर्भात वादीने दाखल केला व तो कधी म्हणजेच कोणत्या तारखेस वादीने न्यायालयाच्या परवानगीने काढुन घेतला व त्यानंतर प्रस्तुतचा दावा कशासाठी दाखल केला याचा तपशिलवार खुलासा प्रतिवादी क्र.४ ने केलेला आहे; जे की प्रतिवादी क्र.४ च्या म्हणण्यानुसार दाव्यातील बाबी दर्शवितात.

७. युक्तिवादाच्या परिच्छेद क्र.२ मध्ये प्रतिवादी क्र.४ ने मयत वादी यांनी करारपूर्तीसाठी नोटीस कधी दिली, त्याबाबत प्रतिवादी क्र.१ ने नकार दिला, त्यानंतर फौजदारी तक्रार दाखल करण्यात आली याबाबत खुलासा करण्यात आलेला आहे. तसेच त्या अनुषंगाने वादीला अटक करुन साठेखत दस्त पोलीसांनी जप्त केला या बाबी वादीने न्यायालयापासुन लपवून ठेवुन प्रस्तुतचा दावा दाखल केल्याने तो दिवाणी प्रक्रिया संहिता कलम १५१ नुसार फेटाळण्याची विनंती केलेली आहे. सदरील युक्तिवाद विचारात घेण्यात आला. या अनुषंगाने वादमुद्दे पाहण्यात आले. सर्वप्रथम हे नमुद करणे आवश्यक आहे की, दिवाणी प्रक्रिया संहिता कलम १५१ हे न्यायालयाचे मुलभूत अधिकार आहेत. अतिविशिष्ठ बाबींमध्ये न्यायालयाने कारणे नमुद करुन सदरील अधिकारांचा वापर करणे आवश्यक ठरते. प्रतिवादी क्र.४ हे युक्तिवादात कथन करीत असलेली बाब पाहता असे म्हणणे क्रमप्राप्त ठरते की, दिवाणी दाव्याचे स्वरुप व त्यातील बाबी सिध्द करण्यासाठी आवश्यक असणारा पुरावा हा संभवतेच्या प्राबल्यावर (preponderance of probabilities) पहावा लागेल. फौजदारी प्रकरणामध्ये शंकेपलीकडे जावुन सदरील बाब सिध्द करणे आवश्यक आहे. केवळ फौजदारी प्रकरणाची बाब वादीने दाव्यात नमुद केली नाही या सबबीवर दावा फेटाळता येणार नाही. त्याचा वादीच्या करारपूर्तीच्या मागणीवर कसा परिणाम होईल हे अंतिम निकालाच्या वेळेस

वादमुद्दे तसेच आलेल्या पुराव्याच्या अनुषंगाने पाहणे योग्य ठरते. त्यामुळे कलम १५१ खाली दावा फेटाळावा हे प्रतिवादीचे कथन विचारात घेता येवु शकत नाही.

८. प्रतिवादी क्र.४ चा परिच्छेद क्र.३ मधील युक्तिवाद विचारात घेण्यात आला. प्रतिवादीचा युक्तिवाद आहे की, नियमित दिवाणी दावा क्र.४७२/२००२ हा काढुन घेतेवेळी तत्कालीन न्यायालयाने मुदत कायदा, १९६३ चे कलम ३ व ५४ बाबत विचार न करता नविन दाव्यात करारपूर्तीची मागणी करण्याची परवानगी दिली हे न्यायालयाच्या अधिकार क्षेत्राचे बाहेरील आहे म्हणुन दावा चालु शकणार नाही. सदरील दोष हा औपचारिक (formal) नसुन महत्वपूर्ण होता. करीता, दावा फेटाळण्यात यावा. या अनुषंगाने असे म्हणणे क्रमप्राप्त ठरते की, हे न्यायालय सदरील आदेश, म्हणजेच नियमित दिवाणी दावा क्र.४७२/२००२ हा काढुन घेवुन नवीन दाखल करण्याचा, अधिकार क्षेत्राबाहेरील आहे असे विवेचन करु शकत नाही तसेच प्रतिवादीने घेतलेला सदरील आक्षेप निर्णित करण्याचे या न्यायालयाचे अधिकारक्षेत्र नाही. त्याकरिता तत्कालीन प्रतिवादी यांनी सदरील आदेशाविरुध्द वरिष्ठ न्यायालयात दाद मागणे हा पर्याय उपलब्ध होता. करिता, या मुद्दयावर देखील दावा फेटाळता येवु शकत नाही.

९. प्रतिवादी क्र.४ चा परिच्छेद क्र.४ मधील युक्तिवाद विचारात घेण्यात आला. दावा मुदतीत आहे काय ? हा मुद्दा काढण्यात आलेला आहे. उपरोक्त परिच्छेदातील विवेचन पाहता पुन्हा दिनांक १५.०९.२०१० चा आदेश कायदेशीर आहे अथवा नाही हे विवेचन करण्याची आवश्यकता नाही. करिता सदरील युक्तिवाद पुन्हा विचारात घेण्यात येत नाही.

१०. परिच्छेद क्र.५ मधील युक्तिवाद हा पुन्हा थोड्याफार प्रमाणात पुर्वीच्याच युक्तिवादाचा भाग असल्याचे या न्यायालयाचे मत आहे. मुदतीचा मुद्दा काढण्यात आल्याने तसेच दावा करारपूर्तीचा असुन, वादी हे करारपूर्तीची दाद मंजूर होण्यास पात्र आहेत अथवा नाही ? हे पुराव्याअंती स्पष्ट होणार असल्याने, पुन्हा त्याच बाबीवर याक्षणी दावा फेटाळण्याचे कारण नाही. याच अनुषंगाने म्हणजेच दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २३ नियम २ मधील तरतुदींच्या अनुषंगाने प्रतिवादी क्र.४ ने परिच्छेद क्र.७ मध्ये केलेला युक्तिवाद विचारात घेण्यात येतो. मुदतीचा कायदा आर्टीकल १४ चा फायदा वादीस मिळेल अथवा नाही ही बाब देखील अंतिम निकालाच्या वेळेस विचारात घेणे आवश्यक आहे; कारण दावा मुदतीत आहे काय ? हे ठरविताना आर्टीकल १४ च्या अनुषंगाने बाबी आल्या काय व त्या तथ्यपूर्ण आहेत काय ? याची तपासणी देखील न्यायनिर्णयाच्या वेळेस होणार आहे. करीता परिच्छेद क्र.५ व

७ मधील युक्तिवाद हा दावा या टप्प्यावर फेटाळण्याच्या अनुषंगाने विचारात घेता येणार नाही.

११.	परिच्छेद क्र.६ मधील युक्तिवाद हा वादीच्या म्हणण्यास प्रतिवादी क्र.४ चे कथन आहे.

१२.	परिच्छेद क्र.८ मधील युक्तिवाद विचारात घेण्यात आला. प्रतिवादी क्र.४ ते ६ यांनी वादमिळकत दिनांक २६.११.२००९ रोजी विकत घेतली म्हणजे पुर्वीचा दावा प्रलंबित असतांना त्यांना ते प्रामाणिक खरेदीदार आहेत अथवा काय ? याबाबत पुरावा देण्याची संधी आहे. सर्वप्रथम मुद्दा हा कराराची बाब वादी सिध्द करतात काय ? हा आहे. त्यानंतर मागणीप्रमाणे वादी हे करारपुर्तीसाठी पात्र आहेत काय ? हे विविध मुद्दयांच्या पुराव्याच्या अनुषंगाने ठरणार आहे. त्यामुळे याक्षणी सदरील मुद्दयावर दावा फेटाळता येणार नाही असे या न्यायालयाचे मत आहे. तसेच वादीने मुळ साठेखत दाखल न केल्याने न्यायालयाच्या दिनांक १८.१०.२०१८ रोजीच्या आदेशाचा अवमान केला म्हणुन दावा फेटाळण्याची विनंती करण्यात आलेली आहे. या अनुषंगाने एवढेच म्हणणे क्रमप्राप्त ठरते की, सदरील दस्त पोलीसांनी जप्त केल्यावर हस्तलेखन तज्ञाकडे पाठविलेला होता व तो संबंधित फौजदारी प्रकरणात दाखल करण्यात आलेला नाही. सदरील बाब पाहता व संबंधित दस्त हस्तलेखन तज्ञाकडुन जप्त (impound) करणेकामी मागवावा हा वादीचा अर्ज पाहता या युक्तिवादाच्या अनुषंगाने दावा फेटाळता येणार नाही. करीता सदरील युक्तिवाद देखील विचारात घेता येणार नाही.

१३.	परिच्छेद क्र.९ मधील युक्तिवाद पाहता व दस्त मागविण्याचा अर्ज तसेच दस्तास लागणारे अपुरे मुद्रांक शुल्क दंडासह भरण्यास वादी तयार आहेत ही बाब पाहता सदरील युक्तिवाद गैरलागु ठरतो. दस्त नोंदणीकृत नसेल तर त्याचा काय परिणाम होईल व कोणत्या दादी मंजूर होण्यास वादी पात्र आहे ? हे अंतीम निकालाच्या वेळेस पाहिले जाईल. करीता, सदरील युक्तिवाद विचारात घेता येणार नाही.

१४.	आता प्रतिवादीतर्फे दाखल न्यायनिर्णय विचारात घेणे आवश्यक आहे.

प्रतिवादीतर्फे मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या **काशीनाथ वि. विष्णु (सिव्हील रिव्हीजन अर्ज क्र.४४/२०२५, ७ एप्रिल, २०१७)** या न्यायनिर्णयाचा आधार घेण्यात आला. त्यातील बाबी व या प्रकरणातील बाबी भिन्न आहेत. न्यायालयाने वादीस दावा काढुन घेवुन नविन दावा दाखल करण्याची परवानगी दिली होती व तो आदेश त्यातील प्रतिवादीने

मा. उच्च न्यायालयात आव्हानित केला होता. यातील प्रतिवादी क्र.१ व २ यांनी पुर्वीचा आदेश मा. वरिष्ठ न्यायालयात आव्हानित केलेला नाही.

१५. प्रतिवादीतर्फे मा. सर्वोच्च न्यायालयाच्या **व्ही. राजेंद्रन आणि इतर वि. अन्नासामी (२०१७) ५ एस.सी.सी.६३** या न्यायनिर्णयाचा आधार घेण्यात आला. त्यातील परिच्छेद क्र.१२ व १३ मधील विवेचन पाहता तो न्यायनिर्णय प्रस्तुत परिस्थितीत प्रतिवादीस उपयोगी पडत नाही कारण दावा काढुन घेण्याची परवानगी दिल्याचा आदेश आव्हानित केलेला नाही.

१६. मा. सर्वोच्च न्यायालयाचा **के. एस. भूपती आणि इतर वि. कोकीला आणि इतर (२०००) ५ एससीसी ४५८** हा न्यायनिर्णय देखील प्रतिवादीस या अर्जाच्या अनुषंगाने उपयोगी पडत नाही. त्यातील परिच्छेद क्र.१८ मधील विवेचन पाहता पुन्हा असे म्हणणे क्रमप्राप्त ठरते की, प्रतिवादी क्र.१ ने सदरील दावा काढुन घेण्याची न्यायालयाने दिलेली परवानगी आव्हानीत केलेली नव्हती व प्रतिवादीचा अर्ज हा दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २३ नियम २ प्रमाणे आहे.

१७. प्रतिवादीतर्फे मा. सर्वोच्च न्यायालयाच्या **इंडियन इव्हॅन्गेलीकल लुथरन चर्च ट्रस्ट असोसिएशन वि. श्री बाला आणि कंपनी (सिव्हील अपील क्र.१५२५/२०२३, दि.०८.०१.२०२५)** या न्यायनिर्णयाचा आधार घेण्यात आला. सदरील प्रकरणातील बाबी व या प्रकरणातील बाबी भिन्न आहेत. त्यातील निष्कर्ष येथे लागु पडत नाही. हा अर्ज न्यायालयाचा नियमित दिवाणी दावा क्र.४७२/२००२ मध्ये वादीस दावा काढून घेण्याची परवानगी देण्याचा आदेश कसा चुकीचा आहे व नियम २ प्रमाणे दावा फेटाळण्यात यावा याकरिता आहे.

१८. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या **सब्बीर (मयत) वारस वि. अंजुमन (मयत) वारस (सिव्हील अपील क्र.६०७५/२०२३)** या न्यायनिर्णयाच्या दाव्यातील बाबी व प्रस्तुत अर्जाच्या अनुषंगाने दाव्यात आलेल्या बाबी भिन्न आहेत. दाव्यामध्ये मुदतीचा मुद्दा काढण्यात आलेला आहे. करिता, सदरील न्यायनिर्णय प्रतिवादीस उपयोगी पडत नाही.

१९. प्रतिवादीतर्फे मा. सर्वोच्च न्यायालयाचा **दिना (मयत) वारस वि. भारत सिंग (मयत) वारस आणि इतर (एआयआर २००२ एससी २७६८)** या न्यायनिर्णयाचा आधार

घेण्यात आला. सदरील दाव्यामध्ये आर्टीकल १४ च्या अनुषंगाने विवेचन करण्यात आलेले आहे. त्यामध्ये दावा निकाली निघाला, त्यावर प्रथम व द्वीतीय अपील झाल्यानंतर संबंधित द्वीतीय अपीलातील आदेशाविरुध्द मा. सर्वोच्च न्यायालयात अपील दाखल करण्यात आले त्यामध्ये आर्टीकल १४ च्या अनुषंगाने विवेचन करण्यात आले आहे. या दाव्यात मुदतीचा मुद्दा आहे. करीता या अर्जाच्या अनुषंगाने सदरील न्यायनिर्णय या टप्प्यावर प्रतिवादीस उपयोगी पडत नाही.

२०. मा. उच्च न्यायालयाच्या **आर. त्यागराजन वि. मिनाक्षी अम्मल (१९९६ (२) सीटीसी १२७)** या प्रकरणातील बाबी व या दाव्यातील बाबी भिन्न आहेत. त्यामध्ये दिलेली दावा काढून घेण्याची परवानगी रद्द करण्यात आली होती. करिता सदरील न्यायनिर्णय प्रतिवादीस उपयोगी पडत नाही.

२१. मा. उच्च न्यायालयाचा **कुर्जी जिनाभाई कोटेचा वि. अंबालाल पटेल (एआयआर गुज एलआर३३४)** विचारात घेण्यात आला. त्यात दावा काढुन घेण्याची (withdrawn) परवानगी आव्हानित करण्यात आलेली होती व तो आदेश रद्द करण्यात आला.

२२. **श्रीमती अरिफा आणि इतर वि. अभिमान अपार्टमेंट आणि इतर (एसपीएल (सी)@ डायरी क्र.१४९७६/२०२४)** या प्रकरणातील बाबी व या अर्जाच्या अनुषंगाने समोर मांडण्यात आलेल्या बाबी भिन्न आहेत. मा. उच्च न्यायालयाची परवानगी मिळाल्यानंतर दाखल केलेला दुसरा दावा न्यायालयाने मंजूर केला. त्यानंतर प्रथम अपीलात सदरील आदेश व हुकूमनामा रद्द करण्यात आला. त्यावर सदरील आदेश मा. सर्वोच्च न्यायालयात आव्हानीत करण्यात आलेला आहे. पुन्हा असे म्हणणे क्रमप्राप्त ठरते की, न्यायालयाने पुर्वीच्या दाव्यात केलेला आदेश हे न्यायालय बरोबर आहे अथवा चुकीचे हे ठरवु शकत नाही तसे कार्यक्षेत्र या न्यायालयास नाही. करिता, उपरोक्त न्यायनिर्णय देखील प्रतिवादीस उपयोगी पडत नाही.

२३. वरील सर्व बाबी व न्यायनिर्णयांचे अवलोकन करता प्रतिवादीचा अर्ज नामंजूर होण्यास पात्र आहे. प्रतिवादीस आर्टीकल १४ च्या अनुषंगाने व मुदतीच्या कायद्याच्या अनुषंगाने सर्व बाबी पुराव्यात उपस्थित करण्याचा अधिकार आहे. करिता, पुरावा नोंदविण्यापूर्वी या टप्प्यावर अर्जातील नमुद कारणांकरिता दावा फेटाळता येवु शकत नाही. करीता, खालील आदेश.

**<u>आदेश</u>**

अर्ज नामंजूर करण्यात येतो.

( खुल्या न्यायालयात घोषित.)

स्वाक्षरीत/–

दिनांक : १४.११.२०२५

(नीलेश सु. बुद्रुक)
सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
पंढरपूर.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file are same word to word as per the original.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : | Suresh M. Malkapalli |
| (b) | Court | : | Jt. Civil Judge (S.D.), Pandharpur. |
| (c) | Signed by P.O. On | : | 17.11.2025 |
| (d) | Uploaded on | : | 19.11.2025 |